**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०७ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही, असं पंतप्रधानांचं प्रतिपादन.**
2. **लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील विधानसभा मतदानाच्या संदर्भात पुराव्यासकट केले आरोप; भाजपची टीका.**
3. **11 वा राष्ट्रीय हातमाग दिन देशभरात होतोय साजरा; नागपूरच्या विणकर सेवा केंद्राद्वारे देखील कार्यक्रमाचे आयोजन.**
4. **गडचिरोली जिल्ह्यातल्या काटली गावाजवळ रस्ता अपघातात चार विद्यार्थ्यांचा मृत्यू.**

---

**डॉ.एम.एस.स्वामीनाथन पुरस्कार**

केंद्र सरकार शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी तसंच, शेतीवरचा खर्च कमी करण्यासाठी सातत्यानं काम करत असून, शेतकऱ्यांच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही असं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत आज हरित क्रांतीचे प्रणेते, डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांच्या जन्म शताब्दी निमित्त आयोजित आंतरराष्ट्रीय संमेलनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. डॉ.स्वामिनाथन यांनी भारताला, अन्नाच्या उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्यासाठीच्या चळवळीचं नेतृत्व केलं, असंही मोदी यावेळी म्हणाले. याप्रसंगी मोदी यांनी, शेतकरी कल्याणच्या योजनांविषयी माहिती दिली....

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी 26 सेकंद)***

***पीएम किसान सम्मान निधि से मिलने वाली सीधी सहायता ने छोटे किसानों को आत्मबल दिया है। पीएम फसल बीमा योजना ने किसानों को जोखिम से सुरक्षा दी है। 10,000 एफपीओ (FPO's) के निर्माण ने छोटे किसानों की संगठित शक्ति बढ़ाई है। कोऑपरेटिव्स और सेल्फ हेल्प ग्रुप्स को आर्थिक मदद ने ग्रामीण अर्थव्यवस्था को नई गति दी है।***

विज्ञान म्हणजे केवळ शोध नव्हे तर, पोहोचवणंही आहे हे, स्वामीनाथन यांचं वक्तव्य त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवलं. ते केवळ संशोधक

नव्हते, तर शेतकऱ्यांना नवे शेतीतंत्र स्वीकारण्यासाठी प्रेरित करणारे मार्गदर्शक होते असं, पंतप्रधान म्हणाले. सदा हरित क्रांती, जैव आनंदाचा मार्ग असा या संमेलनाचा विषय आहे.

---------------------------------------------

**उपराष्ट्रपती निवडणुक**

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगानं आज अधिसूचना जारी केली. या महिन्याच्या २१ तारखेपर्यंत अर्ज दाखल करता येणार असून, उप-राष्ट्रपती पदाची निवडणूक नऊ सप्टेंबरला होणार आहे.

---------------------------------------------

**राहुल गांधी**

काँग्रेस खासदार आणि लोक सभेतील विरोधी पक्षनेते, राहुल गांधी यांनी आज पुन्हा, एकदा निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे. त्यांनी महाराष्ट्र निवडणुकीच्या आकडेवारीचा दाखला देत आरोप केला की, राज्य विधानसभा निवडणुकी दरम्यान मोठ्या प्रमाणावर गडबड करण्यात आली. त्यांनी हेही सांगितले की, गेल्या पाच महिन्यांत, गेल्या पाच वर्षांच्या तुलनेत, अधिक मतदारांची नोंदणी झाली आहे. विधानसभा निवडणुकीत ४० लाख मतदार रहस्यमय पद्धतीने जोडले गेले, ज्यामुळे, संशय अधिक वाढला आहे. दिल्लीमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते पुढे म्हणाले, “पाच वर्षांनंतर अचानक मतदानात मोठी वाढ झाली, विशेषतः सायंकाळी पाच नंतर, मोठा टर्नआउट झाला आणि हे सगळ्यांनी पाहिलं. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत आमचं आघाडीचं गठबंधन साफ पराभूत झालं, तर काही महिन्यांपूर्वीच लोकसभा निवडणुकीत याच गठबंधनने मोठा विजय मिळवला होता. हेही अत्यंत संशयास्पद आहे.” दरम्यान राहुल गांधी यांच्या आरोपावर भाजपाने राहुल गांधी यांनी केवळ संविधानिक संस्थाचाच नाही तर मतदारांचा अपमान केला असल्याची टीका केली.

---------------------------------------------

**पक्षप्रवेश**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परभणी जिल्ह्यातील तीन वेळचे आमदार, बाबाजानी दुर्राणी यांनी आज, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि माजीमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख

उपस्थितीत, काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेस पक्षाचे मुख्यालय टिळक भवन इथं हा पक्षप्रवेश सोहळा, पार पडला.

---------------------------------------------

**तिरंगा मॅरेथॉन**

केंद्र शासनाच्या 'हर घर तिरंगा' या अभियानांतर्गत नागपूर महानगर पालिकेच्या वतीनं येत्या १२ ऑगस्ट रोजी सकाळी साडेपाच वाजता “तिरंगा मॅरेथॉन” आयोजन करण्यात आलं आहे. मनपाच्या क्रीडा आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीनं पाच किलोमीटरच्या, "तिरंगा मॅरेथॉन"चं आयोजन करण्यात आलं आहे. ही मॅरेथॉन मुख्यमंत्री निवास, 'रामगिरी पासून सुरु होईल, अनुराधा न्यायमूर्ती बंगला इथं पोहोचेल आणि येथेच मॅरेथॉनची सांगता होईल. मॅरेथॉन मध्ये सहभागी नागरिकांनी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहे. विशेष म्हणजे यात, मुला-मुली स्पर्धकांमध्ये, प्रत्येकी प्रथम तीन क्रमांकाना अनुक्रमे, ११ हजार, ७ हजार, ५ हजार रुपयांचे रोख बक्षीस दिले जाणार आहे. तर प्रथम १० स्पर्धकांना शूज आणि ११ ते ३० स्पर्धकांना ट्रॅकसूट दिला जाणार आहे. तसंच प्रथम दोन हजार स्पर्धकांना आकर्षक टी-शर्ट दिली जाणार आहे. याशिवाय नोंदणीकृत स्पर्धकांना ई-प्रमाणपत्र दिले जाणार आहे. नागपूर महानगरपालिकेच्या 'एक दौड देशभक्तीसाठी' "तिरंगा मॅरेथॉन" स्पर्धेत सहभागी होण्याकरिता www.nmc-nagpur.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. नोंदणीची अंतिम तारीख १० ऑगस्ट आहे.

---------------------------------------------

**हातमाग पुरस्कार**

देश आज अकरावा राष्ट्रीय हातमाग दिन साजरा करत आहे. ब्रिटीशांच्या राजवटीचा विरोध करताना, हातमागासह अन्य स्वदेशी उत्पादनांना, प्रोत्साहन म्हणून ७ ऑगस्ट १९०५ रोजी, सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. या निमित्तानं, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री, गिरीराज सिंह यांनी आज नवी दिल्लीत, संत कबीर हातमाग पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कार प्रदान केले. सोलापूरच्या राजेंद्र सुदर्शन अंकम यांना संत कबीर हातमाग पुरस्कार मिळाला आहे. साडेतीन लाख रुपये रोख, सुवर्णमुद्रा, ताम्रपट, शाल आणि प्रशस्तीपत्र असं, या पुरस्काराचं स्वरुप आहे. दरम्यान, राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त, नागपूरच्या सिव्हिल लाईन्स नवीन सचिवालय भवन इथं विणकर सेवा केंद्राद्वारे, एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले असून,

यावेळी केंद्रीय रस्ते महामार्ग मंत्रालयातील, विशेष कार्यकारी अधिकारी सुधीर दिवे उपस्थित होते. याप्रसंगी हातमाग प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होते. याप्रसंगी हातमाग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या, तसंच राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त विणकारांचा, सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना सुधीर दिवे यांनी सांगितलं की, विणकर व्यवसायाला चांगले सहकार्य मिळत असून, विदर्भातील धापेवाडा, कळमेश्वर यासारख्या गावामध्ये, 60% संख्या विणकारांची आहे. महिला विणकारांना साडीबांधणी तसंच जकार्ट संचालन यासारख्या तंत्रज्ञानाशी ओळख होण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे असं देखील त्यांनी सांगितलं. याप्रसंगी उद्योजक निधी गांधी यांनी, हातमाग तसंच विणकाम व्यवसायात खूप संधी असल्याचं सांगितलं.

---------------------------------------------

**आपली बस**

नागपूर महानगर पालिकेच्या ‘आपली बस’ या सार्वजनिक बस सेवेनं, नुकताच आणखी एक मोठा विक्रम प्रस्थापित केला आहे. एकाच दिवसात तब्बल १.६० लाखांहून अधिक प्रवाशांनी, 'आपली बस' सेवेचा लाभ घेतला आहे. हा प्रवाशांनी मनपाच्या परिवहन सेवेवरील वाढता विश्वास दर्शवणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या वर्षाच्या शेवटपर्यंत मनपातर्फे १४५ नवीन ई-बस रस्त्यावर धावणार असून, एकूण ४१५ ई-बसेस प्रवाशांसाठी उपलब्ध होणार आहे.

---------------------------------------------

**धर्मजागरण न्यास**

जगातील लोक म्हणतात की आपण वेगवेगळे आहोत आणि म्हणून एक व्हावे लागेल. मात्र हिंदू धर्म विविधतांचा स्वीकार करण्याची शिकवण देतो. तसंच धर्म, मानव धर्माचं आचरणचं शिकवतो. सर्वांचा मार्ग वेगवेगळा असला तरी गंतव्य एकाच जागी असते. त्यामुळ इतरांचा रस्ता बदलण्याचा प्रयत्न करायला नको. धर्मजागरण होईल तेव्हाच हिंदू धर्माच्या आचरणाचा समूह, अस्तित्वात राहील. धर्म ग्रंथापुरता मर्यादित राहणार नाही. जगाला दिशा दाखविण्यासाठी जगासमोर तसं मॉडेल तयार करणे ही भारताचीच जबाबदारी आहे असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक, डॉ.मोहन भागवत यांनी केलं. नागपूरच्या भगवान नगर इथल्या धर्मजागरण न्यासच्या नवनिर्मित कार्यालयाचं काल  त्यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते.

---------------------------------------------

**एआय-सोयाबीन**

राज्यात सोयाबीनच्या उत्पादकतेत वाढ व्हावी या उद्देशानं, धाराशिव तालुक्यात उपळा इथं ए.आय. अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येणार आहे. या प्रयोगांतर्गत १० शेतकऱ्यांच्या शेतात स्वयंचलित हवामान केंद्र तर १० शेतकऱ्यांच्या शेतात, ए.आय. सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. या हवामान केंद्रांच्या २० किलोमीटर परिघातल्या शेतकऱ्यांना पाऊस, वातावरणातली आर्द्रता, उष्णता यांची निरीक्षणं, ए.आय.च्या माध्यमातून मिळणार आहेत. राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीनं सुरू झालेला हा देशातला पहिला प्रकल्प आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे हवामान आणि जमिनीची स्थिती याचा अभ्यास करून सोयाबीन पिकावर पडणाऱ्या कीड रोगांचे व्यवस्थापन तसंच पाणी व्यवस्थापन याला मदत होणार आहे.

---

**हवामान**

हवामान! नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यानं, संपूर्ण विदर्भात, आज तालुक्यातील, मध्यम पावसाचा, येलो अलर्ट घोषित केला असून, नागपुरात आज दुपार पासूनच, पावसाच्या सरींनी, हजेरी लावली. त्यामुळे गेल्या काही दिवस असलेल्या, उकाड्यानं, तापमानात गारवा निर्माण झाला आहे. भंडारा जिल्ह्यात मागील आठ दिवसापासून, पावसानं दडी मारली असल्यानं, धानपीक, हे करपण्याच्या मार्गावर होते आणि उष्णता निर्माण झाली होती. मात्र आज अखेर, दुपारच्या सुमारास, पावसानं दमदार हजेरी लावली असून, आलेला पाऊस, हा धान पिकासाठी, पूरक ठरणारा असून, नागरिकांना उकाड्यापासून, दिलासा मिळाला आहे.

---

**गडचिरोली अपघात**

गडचिरोली जिल्ह्यातल्या काटली गावाजवळ आज सकाळी झालेल्या अपघातात चार विद्यार्थी एका ट्रकच्या धडकेत मृत्यूमुखी पडले. तर अन्य दोघे जखमी झाले. त्यानंतर संतप्त नागरिकांनी हा महामार्ग रोखून धरला. काटली इथले सहा विद्यार्थी आज पहाटे गावाबाहेर फिरायला गेले होते. साडेपाच वाजताच्या सुमारास आरमोरीकडून, भरधाव येणाऱ्या ट्रकनं त्यांना जोरदार धडक दिली. यात पिंकू भोयर आणि तन्मय मानकर हे जागीच ठार झाले, तर सोबतचे चार जण गंभीर जखमी झाले. त्यानंतर दवाखान्यात उपचारा दरम्यान दिशांत मेश्राम

आणि तुषार मारबते यांचाही मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेले क्षितीज मेश्राम आणि आदित्य कोहपरे यांना लॉयड मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या हेलिकॉप्टरनं नागपूरला हलविण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल तीव्र शोक व्यक्त केला असून, मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींच्या उपचाराचा खर्चही, राज्य शासन करणार असल्याचं, त्यांनी म्हटलं आहे.

-----------------------------------------------